# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 09 December 2024
# Time 7.10 AM to 7.20 AM
# Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०९ डिसेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- राज्य विधानसभेच्या अध्यक्षपदी आमदार राहुल नार्वेकर यांची बिनविरोध निवड निश्चित
- बहिष्कार मागे घेत महाविकास आघाडीच्या नवनिर्वाचित आमदारांकडूनही शपथग्रहण
- अंबाजोगाई इथं योगेश्वरी देवीच्या मार्गशीर्ष नवरात्र महोत्सावाला वर्णी महापूजेने प्रारंभ
- पोलिस व्यवस्थेत संरचनात्मक बदलांची अपेक्षा निवृत्त पोलिस अधिकारी डॉ. मीरा बोरवणकर यांच्याकडून व्यक्त

आणि

- आंतरराष्ट्रीय स्तरावरील तीन वेगवेगळ्या क्रिकेट सामन्यांमध्ये भारतीय संघाचा पराभव

****

राज्य विधानसभेच्या अध्यक्षपदी आमदार राहुल नार्वेकर यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. या निवडणुकीसाठी अर्ज करण्याची मुदत काल दुपारी बारा वाजता संपली, या मुदतीत फक्त नार्वेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत अध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल केला. विरोधी पक्षाकडून कोणीही अध्यक्षपदासाठी अर्ज केलेला नाही. आज सभागृहात नार्वेकर यांच्या नावाची अध्यक्ष म्हणून अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे.

****

दरम्यान, महाविकास आघाडीच्या नवनिर्वाचित आमदारांनी सदस्यत्वाच्या शपथग्रहणावर टाकलेला बहिष्कार काल मागे घेतला. अधिवेशनाचं कामकाज सुरु होण्याआधी महाविकास आघाडीच्या नेत्यांची बैठक झाली, त्यात बहिष्कार मागे घेऊन सदस्यत्वाची शपथ घेण्याचा निर्णय झाला. हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी १०६ नवनिर्वाचित आमदारांना विधानसभा सदस्यत्वाची शपथ दिली. दरम्यान, आठ आमदारांनी अजुनही सदस्यत्वाची शपथ घेतलेली नाही, यामध्ये पैठणचे आमदार विलास भुमरे, यांच्यासह उत्तम जानकर, शेखर निकम, वरुण सरदेसाई, मनोज जामसुतकर सुनील शेळके, विनय कोरे आणि जयंत पाटील यांचा समावेश आहे.

****

दरम्यान, सत्ताधारी महायुतीच्या सदस्यांनी काल विधानभवनाच्या पायऱ्यांवर ईव्हीएमच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केली आणि ईव्हीएमला विरोध करणाऱ्या महाविकास आघाडीचा निषेध केला. ईव्हीएमवर शंका घेणं हा संविधानाचा अपमान असल्याची टीका भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

****

मतपत्रिकेवर मतदान घेण्यावरून चर्चेत आलेल्या सोलापूर जिल्ह्यातल्या मारकडवाडी गावाला ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी काल भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. मारकडवाडी ग्रामस्थांनी स्वतःच्या मतांची पडताळणी करण्यासाठी मतपत्रिकेवर मतदान घेण्याचा निर्णय घेतल्यास त्यावर प्रशासनानं आक्षेप घेण्याचं काहीही कारण नाही, असंही ते म्हणाले.

****

दरम्यान, ईव्हीएमवर आक्षेप घेऊन शरद पवार यांनी लोकशाहीवरुन लोकांचा विश्वास उठेल, असं वक्तव्य करु नये, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. विरोधकांनी पराभव स्वीकारावा, असं त्यांनी सांगितलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यासंदर्भात बोलतांना, निवडणुकीतल्या अपयशाचं खापर मतदानयंत्रावर फोडण्याची विरोधकांची कृती लोकशाहीला अपायकारक असल्याचं म्हटलं आहे. महाविकास आघाडीला लोकसभा निवडणुकीत जास्त जागा मिळाल्या तेव्हा ईव्हीएमवर आक्षेप का घेतला गेला नाही, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

****

मारकडवाडी इथं ईव्हीएम मशीन मध्ये बिघाड झाला असण्याची शक्यता असू शकेल, मात्र, एखादं मशीन बिघडलं म्हणजे सर्वच ईव्हीएम खराब आहेत असा त्याचा अर्थ होत नाही, असं मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केलं आहे. ते काल नाशिक इथं वार्ताहरांशी बोलत होते. ग्रामस्थांना काही शंका असतील तर निवडणूक आयोगाने त्याचा तपास करून शंका निरसन केलं पाहिजे, असं आठवले म्हणाले.

****

नांदेड जिल्ह्यात लोकसभा पोटनिवडणूक आणि विधानसभेच्या निवडणुकीत इव्हीएम आणि व्हीव्हीपॅटच्या मतांची पडताळणी निवडणूक आयोगाच्या सूचनाप्रमाणे करण्यात आली. यासंदर्भात अधिक माहिती देत आहेत आमचे वार्ताहर,

> ***''लोकसभेच्या तीस आणि विधानसभेच्या पंचेचाळीस अशा एकूण पंच्याहत्तर मतदान केंद्रावरील मतमोजणी बिनचूक असल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिली. लॉटरी पद्धतीनुसार या निवडक केंद्रांची सर्व उमेदवारांच्या प्रतिनिधींच्या समक्ष चिठ्ठी काढून निवड करण्यात आली होती. तर मतमोजणीची ही पडताळणी प्रक्रिया निवडणूक निरीक्षकांच्या पुढे केली गेली.''***

***आकाशवाणी बातम्यांसाठी नांदेडहून अनुराग पोवळे***

****

कोणत्याही राज्याचं राज्यपालपद मिळवून देण्याचं आमिष दाखवून तामिळनाडू इथल्या एका इसमाला पाच कोटी रुपयांचा गंडा घालणाऱ्या नाशिकच्या एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. निरंजन कुलकर्णी असं या आरोपीचं नाव असून, त्याने तामिळनाडू इथल्या नरसिम्हा रेड्डी या व्यक्तीला आपल्या राजकीय ओळखी सांगून, कोणत्याही राज्याचं राज्यपालपद मिळवून देण्याचं आमिष दाखवून त्यासाठी १५ कोटी रुपयांची मागणी केली आणि त्यातले पाच कोटी आठ लाख रुपये देखील घेतले होते. न्यायालयाने या आरोपीला दहा दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

****

अंबाजोगाई इथल्या श्री योगेश्वरी देवीच्या मार्गशीर्ष नवरात्र महोत्सावाला काल वर्णी महापूजेने प्रारंभ झाला. तहसीलदार विलास तरंगे यांनी सपत्निक योगेश्वरी देवीची

विधीवत महापूजा केली. महोत्सवाच्या कालावधीत मंदिरात जवळपास चार ते पाच हजार महिला आराध बसणार असल्याची माहिती देवल समितीच्या वतीने देण्यात आली.

****

पोलिस व्यवस्थेत संरचनात्मक बदल व्हावेत, अशी अपेक्षा निवृत्त पोलिस अधिकारी डॉ. मीरा चड्ढा बोरवणकर यांनी व्यक्त केली आहे. छत्रपती संभाजीनगर इथं काल अनंत भालेराव प्रतिष्ठानचा 'अनंत भालेराव स्मृती पुरस्कार' बोरवणकर यांना प्रदान करण्यात आला, त्यानंतर 'पोलीस, राज्यकर्ते आणि समाज: आव्हाने आणि उपाय' या विषयावर त्या बोलत होत्या. गुन्हेगारीचं प्रमाण वाढत असून, त्या तुलनेने पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असल्याकडे त्यांनी लक्ष वेधलं..

५० हजार रुपये, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह या स्वरुपाचा हा पुरस्कार मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती सुनील देशमुख यांच्या हस्ते बोरवणकर यांना प्रदान करण्यात आला, बोरवणकर यांनी हा पुरस्कार राज्यातल्या पोलिसांना, तर पुरस्काराची रक्कम पोलीस फाउंडेशनला समर्पित केली.

****

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये काल झालेल्या तीन वेगवेगळ्या प्रकारातील सामन्यांमध्ये भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला.

दुबई इथं १९ वर्षाखालील आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात काल भारताचा बांग्लादेशकडून ५९ धावांनी पराभव झाला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करत बांग्लादेशनं भारतासमोर विजयासाठी १९९ धावांचं आव्हान ठेवलं होतं. मात्र प्रत्युत्तरात भारताचा संपूर्ण संघ ३५ षटकं आणि दोन चेंडूत १३९ धावा काढून बाद झाला.

****

महिला क्रिकेटमध्ये देखील ब्रिस्बेन इथं झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारतावर १२२ धावांनी विजय मिळवला. तीन सामन्यांच्या या मालिकेत ऑस्ट्रेलियानं दोन – शून्य अशी विजयी आघाडी घेतली आहे. मालिकेतला तिसरा आणि अखेरचा सामना येत्या ११ डिसेंबरला पर्थ इथं होणार आहे.

**

बॉर्डर–गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतला ॲडलेड इथं झालेल्या दुसऱ्या सामन्यात भारताला पराभव पत्करावा लागला. ऑस्ट्रेलियानं हा सामना दहा गडी राखून जिंकला असून, पाच सामन्यांच्या मालिकेत १ – १ अशी बरोबरी साधली आहे.

काल सामन्याच्या तिसऱ्या दिवशी भारताचा दुसरा डाव केवळ १७५ धावांतच आटोपला. नितीश रेड्डी यानं सर्वाधिक ४२ धावा केल्या. ऑस्ट्रेलियानं पहिल्या डावात भारतावर १५७ धावांची आघाडी घेतली होती. त्यामुळे दुसऱ्या डावात यजमान संघासमोर विजयासाठी अवघं १९ धावांचं आव्हान उरलं. ते ऑस्ट्रेलियानं एकही गडी न गमावता पूर्ण केलं. मालिकेतला तिसरा सामना येत्या १४ डिसेंबरपासून ब्रिस्बेन इथं खेळला जाणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करून विविध कार्यक्रमांची सुरुवात काल करण्यात आली. महापालिकेच्या विविध वाहनांचं पथसंचलनही काल करण्यात आलं. वर्धापन दिनानिमित्त आजपासून तीन दिवस विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

अहिल्यानगर जिल्ह्यात तरवडी इथल्या सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील स्मारक समितीचे राज्यस्तरीय पत्रकारिता आणि साहित्य पुरस्कार जाहीर झाले आहेत. राधेशाम जाधव यांना पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला असल्याची माहिती, स्मारक समितीचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग यांनी दिली. यासह इतर साहित्य पुरस्कारांचं वितरण येत्या २२ तारखेला तरवडी इथं होणार आहे.

****

सातारा जिल्ह्यातल्या किल्ले प्रतापगडावर काल शिवप्रताप दिन साजरा करण्यात आला. भवानी मातेची महापूजा तसंच ध्वजस्तंभाचं पूजन करुन भगव्या ध्वजाचं रोहण करण्यात आलं. आरती नंतर मानाच्या पालखीची मान्यवरांच्या हस्ते पूजा करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली.

****

परभणी जिल्ह्याच्या सेलू शहरात जायकवाडी वसाहतीत जलसंपदा विभागाच्या निम्न दुधना प्रकल्पाच्या कार्यालयाला काल रात्री आग लागली. आग विझवण्याचे प्रयत्न रात्री उशीरापर्यंत सुरू होते.

****

फेंजल चक्रीवादळाचा प्रभाव ओसरल्यानंतर आता राज्यात थंडी परतण्याची शक्यता आहे. पुढच्या दोन दिवसात राज्यात काही भागात पावसाच्या हलक्या सरींची शक्यता असली तरी, उर्वरित भागात हवामान कोरडे होण्यास सुरुवात झाल्यानं, गारठा वाढणार असल्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

****